**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २८३ । मंगळवार ११ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# श्रीगोंद्यात तीन गुटखा विक्रेत्यांवर छापे

## एलसीबीच्या कारवाईत १ लाख ११ हजारांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन ठिकाणी छापे टाकून अवैध सुगंधी तंबाखू आणि गुटखा विक्रेत्यांवर कारवाई केली. या कारवाईत तीन वेगवेगळ्या गुन्ह्यांत ६ आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण १ लाख १० हजार ९७६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक १० ऑगस्ट रोजी पथकाने गुप्त माहितीच्या आधारे छापा टाकून स्वप्नील भीमराव कवडे (वय ३२, रा. होले मळा, श्रीगोंदा),, मुख्य पुरवठादार अमोल रामदास जाधव (रा. लिंपणगाव, फरार) यांच्यावर गुन्हे दाखल केले. दुसऱ्या छाप्यात बन्सी गंगाधर काळे (वय ६२, रा. अवधुतनगर, श्रीगोंदा) याच्याकडून ३५ हजार ८६० रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणातही अमोल जाधव आरोपी असून तो फरार आहे. तिसऱ्या छाप्यात अल्ताफ गुलाब मुजावर (वय ५४, रा. तान्हाई अपार्टमेंट, श्रीगोंदा) व सलीम



दिलावर पिरजादे (रा. अजनूज, फरार) यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले.

फरार आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार गणेश लोंढे, अमोल कोतकर, मनोज साखरे, प्रताप देवकाते, सुनील मालणकर आणि बाळासाहेब गुंजाळ यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# हप्ते खोर पोलीसांवर कडक कारवाई करून परवाना नसलेल्या व स्क्रॅप केलेल्या रिक्षा कायमच्या बंद करा

## अन्यथा पालकमंत्र्यांना काळे झेंडे दाखवून घेराव घालण्याचा रिक्षा संघटनेचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहरात परवाना नसलेल्या व स्क्रॅप केलेल्या शेकडो रिक्षा राजरोसपणे धावत आहेत. केवळ ३ प्रवाश्यांचा परवना असलेल्या रिक्षांमधून सर्रास जादा १० ते १२ प्रवाश्यांची बेकायदेशीर वाहतूक होत आहे. वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने राजरोजपणे हे होत आहे. यासाठी वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी रिक्षाचालकांकडून १२०० रूपये महिन्याप्रमाणे हप्ते गोळा करून प्रवाशांच्या जिवाशी खेळत आहेत. त्यामुळे परवाना नसलेल्या रिक्षा तातडीने जप्त करून कायमस्वरूपी बंद कराव्यात, तसेच हप्ते खोर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवरही कडक कारवाई करून राज्य गुन्हा अन्वेशन विभागाकडून या हप्तेखोरीचा तपास करावा. अन्यथा दि. १५ ऑगस्ट रोजी आहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्र्यांना काळे झेंडे दाखवून घेराव घालू, या इशाऱ्याचे निवेदन अहिल्यानगर जिल्हा रिक्षा चालक मालक संघटनेचे कार्याध्यक्ष विलास कराळे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना दिले.

यावेळी देण्यात आलेल्या निवेदनांत नमूद केले आहे की, नगर शहरात ५५०० रिक्षांची अधिकृत नोंद आहे. मात्र शहरात या रिक्षा व्यतिरिक्त आर.टी.ओ कडे नोंद नसलेल्या व स्क्रॅप केलेल्या हजारो रिक्षा राजरोसपणे प्रवासी वाहतूक करत आहेत. तसेच बेकायदेशीरपणे रिक्षांमध्ये १० ते १२ प्रवासी कोंबून बसवले जात असून प्रवाश्यांच्या जीवाचा खेळ केला जात आहे. हे सर्व बेकायदेशीर कामे वाहतूक शाखेच्या व प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या आशीर्वादाने होत असून वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी रिक्षाचालकांकडून १२०० रूपये प्रती महिना हप्ता घेत आहेत.

प्रवाश्यांच्या जीवाचा खेळ हे अधिकारी व विना परवाना रिक्षाचालक करत आहेत. हा प्रकार तातडीने थांबवा व परवाना नसलेल्या रिक्षा तातडीने जप्त करून कायमस्वरूपी बंद करा. तसेच हप्ते खोर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावरही कडक कायदेशीर कारवाई करून राज्य गुन्हा अन्वेशन विभागाकडून या हप्तेखोरीचा तपास करावा. अन्यथा दि. १५ ऑगस्ट रोजी आहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री यांना काळे झेंडे दाखवून घेराव घालू, असा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनावर अहिल्यानगर जिल्हा रिक्षा चालक मालक संघटनेचे उपाध्यक्ष नासीर खान, दत्ता वामन, सुधाकर साळवे, अशोक औशिकार, लतीफ शेख, गणेश आटोळे आदींच्या सह्या आहेत.

# महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या संवर्धनासाठी केंद्राचा विशेष निधी द्या

## जागतिक वारसा किल्ल्यांसाठी स्वतंत्र संवर्धन व पुनरुज्जीवन पॅकेज जाहीर करण्याची खासदार नीलेश लंके यांची पंतप्रधानांकडे मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या ऐतिहासिक किल्ल्यांचे संरक्षण, संवर्धन आणि पुनरुज्जीवन करण्यासाठी केंद्र सरकारने विशेष निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच 'मराठा लष्करी भूदृश्य' या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या महाराष्ट्रातील किल्ल्यांसाठी स्वतंत्र संवर्धन व पुनरुज्जीवन पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी खासदार निलेश ज्ञानदेव लंके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे.

'मराठा लष्करी भूदृश्य' या ऐतिहासिक वारशाचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्याच्या पार्श्वभूमीवर खासदार लंके यांनी पंतप्रधानांना निवेदन देत महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या संवर्धनाचा मुद्दा गांभीर्याने मांडला आहे. महाराष्ट्रातील किल्ले हे केवळ पर्यटनस्थळे नसून छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या पराक्रमाची, दूरदृष्टीची आणि स्थापत्यकौशल्याची जिवंत साक्ष देणारा अमूल्य वारसा आहे. त्यामुळे या ऐतिहासिक ठेव्याचे जतन करणे ही शासनाची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांकडे नियमित देखभाल व पुरेशा निधीअभावी दुर्लक्ष होत असून काही किल्ल्यांची तटबंदी, बुरुज, प्रवेशद्वारे, पाण्याच्या टाक्या आणि अन्य ऐतिहासिक वास्तू जीर्ण होत आहेत. काळाच्या ओघात या वास्तूंचे नुकसान वाढत असून वेळीच उपाययोजना न केल्यास ऐतिहासिक वारशाची अपरिमित हानी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे किल्ल्यांच्या संवर्धनासाठी केंद्र सरकारने स्वतंत्र आणि दीर्घकालीन आर्थिक तरतूद करावी, अशी मागणी लंके यांनी केली आहे.

किल्ल्यांची प्राचीन वास्तुरचना आणि ऐतिहासिक स्वरूप अबाधित ठेवून शास्त्रोक्त पद्धतीने संवर्धनाची कामे करणे आवश्यक आहे. तटबंदी, बुरुज, प्रवेशद्वारे, जलव्यवस्था, प्राचीन वास्तू तसेच किल्ल्यांवरील ऐतिहासिक अवशेषांचे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली जतन करण्यात यावे. संवर्धनाच्या कामांसाठी पुरातत्त्व, वास्तुशास्त्र आणि इतिहास क्षेत्रातील तज्ज्ञांचा ■ पान ४ वर

### रिक्षाचालक–मालकांच्या विविध मागण्यांसाठी पालकमंत्री विखे पाटील यांना निवेदन

#### बेकायदेशीर रिक्षा वाहतूक, आरटीओतील कथित लूट थांबविण्यासह दूध भेसळीवर कठोर कारवाईची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा टॅक्सी चालक–मालक संघटनेच्या वतीने जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले संघटनेचे अध्यक्ष अविनाश तात्या घुले यांच्या नेतृत्वाखाली तसेच कार्याध्यक्ष विलास कराळे यांच्या उपस्थितीत हे निवेदन देण्यात आले. शहरातील प्रायव्हेट, स्क्रॅप झालेल्या तसेच बाहेरून शहरात आलेल्या रिक्षांकडून होणारी कथित बेकायदेशीर वाहतूक तातडीने बंद करावी, अशी प्रमुख मागणी संघटनेने केली.

तसेच आरटीओ कार्यालयात वाहनधारकांची होणारी कथित आर्थिक लूट थांबवून वाहनधारकांना दिलासा द्यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. याशिवाय दूध भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी कडक कायदा करावा, तसेच गंभीर स्वरूपाच्या भेसळ प्रकरणांत कठोर शिक्षा व मोठ्या आर्थिक दंडाची तरतूद करावी, अशी मागणी संघटनेने केली.

यावेळी अहिल्यानगर शहराचे आमदार संग्राम जगताप, मनपा स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे, नगरसेवक महेश लोंढे, संपत बारस्कर, गोरख खांदवे, सतीश मोबाळ, किशोर खुळे, अशोक औशीकर, सतीश खुळे, प्रकाश गोसावी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रिक्षाचालक–मालकांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटना सदैव लढत राहणार असून, त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असा निर्धार यावेळी संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

# बेलवंडी व्यापारी पतसंस्थेच्या विमा योजनेतून वारसांना १२ लाखांचा धनादेश सुपूर्द



**दैनिक आकर्षण । केशव कातोरे**

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथील राष्ट्रीय सन्मान पुरस्काराने गौरविलेल्या बेलवंडी व्यापारी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे सभासद व कर्जदार दत्तात्रय लक्ष्मण विधाटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या कुटुंबीयांना पतसंस्थेच्या विमा संरक्षण योजनेतून १२ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळाली आहे. या विमा रकमेचा धनादेश मयत दत्तात्रय विधाटे यांच्या पत्नी मनीषा दत्तात्रय विधाटे व मुलगी सुषमा दत्तात्रय विधाटे यांच्याकडे पतसंस्थेच्या वतीने सुपूर्द करण्यात आला. पतसंस्थेच्या वतीने सभासद, ठेवीदार व कर्जदारांना विमा संरक्षण देण्यात येते. सभासदाच्या कुटुंबावर अचानक संकट ओढवल्यास त्यांना आर्थिक आधार मिळावा, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. दत्तात्रय विधाटे यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबाला मिळालेल्या १२ लाख रुपयांच्या मदतीमुळे या विमा योजनेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

> बेलवंडी व्यापारी पतसंस्था सभासद,ठेवीदार कर्जदार यांचे हित डोळ्यासमोर ठेवून अत्यंत काळजीपूर्वक काम करत आहे. सभासद, कर्जदार व ठेवीदारांना विमा कवच देणारी व्यापारी पंतसंस्था ही ग्रामीण भागातील एकमेव पंतसंस्था आहे . एखाद्या सभासदावर दुर्दैवी प्रसंग ओढवल्यास त्याच्या कुटुंबाला या विमा योजनेतून मोठा आर्थिक दिलासा मिळतो. सभासदांचा विश्वास हीच पतसंस्थेची खरी ताकद आहे.
>
> **चेअरमन उत्तम डाके**

दरम्यान, विधाटे कुटुंबीयांनी विमा योजनेच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळाल्याबद्दल पतसंस्थेच्या संचालक मंडळाचे आभार मानले.

याप्रसंगी चेअरमन उत्तम डाके, सोपान हिरवे, युवराज पवार, विठ्ठल लोखंडे, सचिव किसन वऱ्हाडे, अर्जुन हिवरकर, अनिल शेलार, सचिन भोसले, संपत हिरवे, राजू साळवे, राजाराम खलाटे, संदीप लबडे, आशा दरवडे, प्रविण खेडकर, विनोद जाधव यांच्यासह पतसंस्थेचे सभासद, ग्रामस्थ उपस्थित होते.

# आदिवासी संस्कृतीच्या रंगात रंगले सावेडी; मिरवणुकीतून परंपरा आणि सांस्कृतिक वारशाचे दर्शन

## पारंपरिक नृत्यांनी वेधले लक्ष; गुणवंतांचा गुणगौरव । बिरसा मुंडा यांना अभिवादन; रानकवी तुकाराम धांडे यांच्या कवितांनी रंगला सांस्कृतिक सोहळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी सेवा प्रतिष्ठान, अहिल्यानगरच्या वतीने सावेडी उपनगरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आदिवासी समाजाची समृद्ध परंपरा, सांस्कृतिक वारसा, निसर्गाशी असलेले अतूट नाते आणि समाजाच्या हक्कांविषयी जनजागृती घडवून आणणाऱ्या भव्य सांस्कृतिक मिरवणुकीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमात आदिवासी समाजबांधव, महिला, युवक–युवती आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून भव्य सांस्कृतिक मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. प्रोफेसर कॉलनी चौक, भिस्तबाग चौक, भिस्तबाग महाल मार्गे ही मिरवणूक श्रेयस लॉनपर्यंत काढण्यात आली.

पारंपरिक वेशभूषेतील आदिवासी युवक–युवती, महिला आणि समाजबांधवांच्या सहभागामुळे मिरवणुकीला विशेष रंगत आली. मिरवणुकीदरम्यान आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणारे कमाडावना नृत्य, टिपऱ्या नृत्य, कांबड लोकनृत्य, फुगडी यांसह विविध पारंपरिक लोकनृत्यांचे सादरीकरण करण्यात आले. पारंपरिक वाद्ये, वेशभूषा आणि लोककलेच्या सादरीकरणामुळे परिसरात आदिवासी संस्कृतीचा जागर झाला.

मिरवणुकीचा समारोप भिस्तबाग महाल शेजारील श्रेयस लॉन येथे झाला. आदिवासी समाजाचे महानायक आणि स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सांस्कृतिक ■ पान ४ वर

# नेवासा खुर्द येथे जुन्या वादातून जीवघेणा हल्ला; १२ जणांविरोधात गुन्हा दाखल!

## एसपी मुम्मका सुदर्शन यांच्याकडून तपासाचे थेट सनियंत्रण; आरोपींच्या शोधासाठी एलसीबीसह ४ पथके रवाना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** नेवासा खुर्द येथील काटे महाराज आश्रम कमानीजवळ जुन्या भांडणाच्या कारणावरून तलवारी, चॉपर, लोखंडी रॉड आणि लाकडी दांडक्यांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात १२ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता () सह महाराष्ट्र पोलीस कायदा व शस्त्र अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, १० ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ९:४५ वाजेच्या सुमारास फिर्यादी आसिफ शेरु शेख (वय ४०, रा. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) यांचा भाऊ जमील शेरु शेख आणि त्यांचे मित्र सोहेल हरुण शेख व सादिक हमीद शेख हे आपले दुकान बंद करून घरी जात होते. नेवासा खुर्द येथील काटे महाराज आश्रम कमानीसमोर आरोपींनी कार व मोपेड ॲक्सेस स्कुटीवरून येऊन त्यांना अडवले. ''मागील भांडणाच्या वेळी तुम्ही वाचले, आज तुम्हाला आम्ही संपवून टाकू'' असे म्हणत आरोपींनी हातातील तलवार, चॉपर, लोखंडी रॉड, लाकडी दांडके आणि दगडांनी जमील शेख व त्यांच्या मित्रांवर जिवे मारण्याच्या उद्देशाने प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात चौघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर नेवासा फाटा येथील आत्मादीप हॉस्पिटल आणि अहिल्यानगर येथील साईदीप हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. आरोपींची नावे: फिर्यादी आसिफ शेरु शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरून नेवासा पोलिसांनी खालील आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे १. राम संजय शिरसाठ (रा. संभाजी नगर, नेवासा खुर्द) २. लखन संजय शिरसाठ ३. आदित्य उर्फ पांड्या कानगरे ४. आरीफ उर्फ बली पठाण ५. आकाश उर्फ अक्षय चक्रनारायण ६. अनुज उर्फ याकुब अनिल चांदणे ७. यश संदीप चांदणे ८. तसेच त्यांच्यासोबत असलेले ४ ते ५ अनोळखी मित्र. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचना; शोधासाठी ४ पथके तैनात घटनेचे गांभीर्य ओळखून जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी तात्काळ आरोपींना अटक करण्याचे आदेश दिले असून, ते स्वतः या घटनेवर व तपासावर बारकाईने ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### जिल्हास्तरीय ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धा १५ व १६ ऑगस्ट रोजी लोणीत रंगणार



अहिल्यानगर- अहिल्यानगर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने 'अहिल्यानगर जिल्हास्तरीय कनिष्ठ गट मैदानी स्पर्धा (ज्युनिअर ॲथलेटिक्स) अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२०२७' चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा आगामी १५ आणि १६ ऑगस्ट २०२६ रोजी लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पार पडणार असल्याची माहिती असोसिएशनच्या वतीने देण्यात आली आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व क्वालिफायिंग स्टँडर्ड्स पूर्ण करणाऱ्या खेळाडूंची डेरवण (जि. रत्नागिरी) येथे दिनांक २७ ते ३० ऑगस्ट रोजी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे. या स्पर्धेत खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष सुनील जाधव, उपाध्यक्ष राजेंद्र कोतकर व सचिव दिनेश भालेराव यांनी केले आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंना स्पर्धेच्या दोन्ही दिवशी ऑफलाईन पद्धतीने प्रवेशिका जमा करता येतील. ही स्पर्धा केवळ अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंसाठीच आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये १४, १६, १८ आणि २० वर्षांखालील अशा चार वयोगटांचा समावेश असून, खेळाडूचे वय किमान १२ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. खेळाडूंनी वय पडताळणीसाठी येथे येताना सक्षम प्राधिकाऱ्याचा जन्माचा दाखला (ज्याची नोंदणी जन्मानंतर दोन वर्षांच्या आत झालेली असावी), १० वीचे बोर्ड प्रमाणपत्र आणि आधार कार्ड ही मूळ कागदपत्रे सोबत आणणे गरजेचे आहे. शनिवार, १५ ऑगस्ट रोजी सकाळी १:०० वाजल्यापासून स्पर्धा स्थळी ऑनलाइन नोंदणी केलेल्या खेळाडूंना चेस्ट नंबरचे वाटप केले जाईल. स्पर्धा संपल्यानंतर चेस्ट नंबर जमा केल्यावर सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल, तर वयाची पडताळणी झाल्यानंतर आणि संबंधित खेळ प्रकारात किमान ४ खेळाडू असल्यास प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.या स्पर्धेसाठी निवास व जेवण याची कोणतीही व्यवस्था आयोजकांकडून केली नसून, ती खेळाडू व पालकांनी स्वतः करावी लागणार आहे. तसेच स्पर्धे दरम्यान होणाऱ्या कोणत्याही दुखापतीला किंवा नुकसानीला असोसिएशन जबाबदार राहणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी खेळाडूंनी दिनेश भालेराव ९९२३८३७८८८, श्रीरामसेतु आवारी ९३२२०१५०४६, जगन गवांदे ९८८१३२८१८६, सुजय बाबर ७५०७६८१७२६, यांच्याशी संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

# मंथन परीक्षेत सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलची उल्लेखनीय कामगिरी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सेंट विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलची विद्यार्थिनी कु. इशिता सतीश लोंढे राज्यस्तरावर ३१,सौमित्र सौरभ लिमये २४, विराज नितीन शेवाळे ३८, अथर्व गणेश कदम ३८,साईश विकास जाधव ४५, स्वानंदी अजय महाजन ३१ व गर्वित भूषण भाटिया याने २४ क्रमांक पटकवात शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. प्रतिष्ठित मंथन परीक्षेतील या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या गुणवत्तेची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

अभ्यासातील सातत्य, कठोर परिश्रम आणि शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाच्या बळावर त्यांनी हे यश मिळविले. त्यांच्या या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका गीता तांबे ,प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कंचन पापडेजा, शिक्षकवृंद, संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर माखिजा तसेच विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी आणि हरेश मध्यान तसेच पालकांनी त्यांचे मनः पूर्वक अभिनंदन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखणाऱ्या सेंट विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलसाठी विद्यार्थ्यांचे हे यश निश्चितच अभिमानास्पद ठरले आहे.

# आईच्या नावाने एक झाड लावून वृक्षसंवर्धनाचा सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या कर्मचाऱ्यांचा अनोखा संदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे संस्थापक सर सोराबजी पोचखानावाला यांच्या जयंतीनिमित्त बँकेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने 'एक पेड माँ के नाम' या भावनिक आणि पर्यावरणपूरक संकल्पनेतून सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या आईच्या नावाने एक झाड लावून वृक्षसंवर्धनाचा अनोखा संदेश दिला.

या उपक्रमाची सुरुवात बँकेच्या सावेडी शाखेपासून वृक्षसंवर्धन जनजागृती रॅलीने करण्यात आली. बँक कर्मचाऱ्यांनी सावेडी पाइपलाइन रोड परिसरातून विळद घाट येथील सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेच्या () परिसरात पोहोचले.'एक पेड माँ के नाम', 'वृक्ष लावा, वृक्ष जगवा', 'झाडे जगली तर मानवजात जगेल' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. रॅलीनंतर



सर्व बँक कर्मचाऱ्यांनी विळद घाट येथील ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेच्या आवारात 'एक पेड माँ के नाम' या संकल्पनेअंतर्गत प्रत्येक कर्मचाऱ्याने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावले. आईने जसे आपल्या मुलाचे संगोपन व संरक्षण केले, त्याच भावनेतून लावलेल्या या रोपट्याचेही नियमित संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प कर्मचाऱ्यांनी यावेळी केला.

याप्रसंगी क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे, वृक्षमित्र शिवाजी पालवे, संदीप काळे ,प्रमोद दहिफळे ,प्रशांत जांगेल, आर जी देशमुख ,आशिष कुमार, शशांक नवले आदीं सहसेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक नरेश कुमार दुबे म्हणाले की, ''वृक्ष हा आपला परमेश्वर आहे. जशी आपण परमेश्वराची पूजा करतो, त्याच भावनेने वृक्षांची पूजा करून त्यांचे संवर्धन केले पाहिजे. वृक्ष जगले तर मानवजात जगेल. पर्यावरण संतुलित राहिल्यास आपले आरोग्यही निरोगी राहण्यास मदत होईल.

# पहिल्याच दिवशी ४०० टन मोसंबीची आवक!

**पाचोडच्या मोसंबी मार्केटमध्ये खरेदी–विक्रीचा शुभारंभ; प्रतिक्विंटल १२ हजार ते १८ हजार रुपयांचा दर**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गतवर्षी अतिवृष्टीमुळे मोसंबी उत्पादकांना मोठा आर्थिक फटका बसल्यानंतर यंदा पाचोड (ता. पैठण) येथील मोसंबी मार्केटमध्ये सोमवारी खरेदी–विक्रीला सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी तब्बल ४०० टन मोसंबीची आवक झाल्याने बाजारपेठेत मोठी लगबग पाहायला मिळाली. विशेष म्हणजे मोसंबीला प्रतिक्विंटल १२ हजार ते १८ हजार रुपयांपर्यंत दर मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव नितीन विखे, मोसंबी मार्केटचे अध्यक्ष अमृत पडळा व केंद्रप्रमुख गणेश फसाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोसंबीची बोली लावून यंदाच्या हंगामातील खरेदी–विक्रीचा शुभारंभ करण्यात आला.

गतवर्षी झालेल्या जोरदार अतिवृष्टीचा मोसंबी पिकाला मोठा फटका बसला होता. मृग बहराची फळधारणा कमी झाल्याने उत्पादनात घट झाली होती. मात्र, यंदा बाजारात सुरुवातीपासूनच चांगला दर मिळाल्याने उत्पादकांच्या आशा उंचावल्या आहेत.

परराज्यातून मागणी कायम पाचोडच्या मोसंबीला दिल्ली, आग्रा, मथुरा, कोलकाता, चेन्नई, वाराणसी, लखनौ, बंगळुरू, राजस्थान, गुजरात, कानपूर, मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर व नाशिकसह विविध बाजारपेठांतून मोठी मागणी आहे. त्यामुळे आगामी काळातही मोसंबीला चांगला भाव मिळण्याची अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. ४०० टनांची आवक आणि १८ हजारांपर्यंत पोहोचलेला दर यामुळे पाचोडच्या मोसंबी मार्केटने हंगामाची दमदार सुरुवात केली आहे.

# गीता परिवारातर्फे विद्यार्थ्यांची एकदिवसीय नगर दर्शन सहल

**चांदबिबी महाल, भुईकोट किल्ल्यासह ऐतिहासिक वारसा स्थळांना भेट; क्रांती दिनानिमित्त स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृतींना अभिवादन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांनी स्थापन केलेल्या व डॉ. संजय मालपाणी कार्याध्यक्ष असलेल्या गीता परिवारातर्फे अहिल्यानगरमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीही उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांसाठी संस्कार वर्गांचे आयोजन करण्यात आले होते. या संस्कार वर्गांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मूल्याधारित शिक्षण देण्याबरोबरच अहिल्यानगरचा वैभवशाली ऐतिहासिक वारसा प्रत्यक्ष अनुभवता यावा, या उद्देशाने एकदिवसीय नगर दर्शन सहलीचे आयोजन करण्यात आले. रविवार, ९ ऑगस्ट रोजी आयोजित या सहलीत तब्बल १५० विद्यार्थी सहभागी झाले.

सहलीची सुरुवात ऐतिहासिक चांदबिबी महालापासून झाली. यावेळी विद्यार्थ्यांना महालाच्या परिसरात आढळणाऱ्या विविध औषधी वनस्पती तसेच चांदबिबी महालाशी संबंधित अनेक सूक्ष्म व महत्त्वपूर्ण बाबी इतिहास संशोधक प्रा. डॉ. नवनाथ काशिनाथ वाव्हळ यांनी अतिशय रोचक पद्धतीने समजावून सांगितल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना इतिहासाबरोबरच परिसरातील जैवविविधता आणि औषधी वनस्पतींचीही माहिती मिळाली.

'विद्या धर्मेण शोभते' या विचाराने



गीता परिवार मूल्याधारित शिक्षणावर भर देतो. विद्या धर्माने सुशोभित होते. अर्थात, ज्ञान किंवा शिक्षण हे धर्माच्या सोबतच शोभायमान दिसते. केवळ पुस्तकी किंवा तांत्रिक ज्ञान पुरेसे नसून त्यासोबत नैतिक मूल्ये आणि नैतिक आचरण असतील, तरच ती खरी आणि शोभिवंत विद्या ठरते. याच विचाराचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना इतिहास, संस्कृती आणि देशभक्तीच्या मूल्यांची प्रत्यक्ष अनुभूती देण्यासाठी या नगर दर्शन सहलीचे आयोजन करण्यात आले.

क्रांती दिनानिमित्त गीता परिवाराच्या दक्षिण अहिल्यानगरच्या अध्यक्षा सौ. सुनंदा सोमाणी व कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर भुईकोट किल्ल्यातील नेता कक्षाला प्रत्यक्ष भेट देऊन 'छोडो भारत' आंदोलनातील देशभक्त आणि क्रांतिकारकांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. 'छोडो भारत' आंदोलनातील प्रमुख १२ राष्ट्रीय नेत्यांनी भुईकोट किल्ल्यातील नेता कक्षात राजबंदी असताना केलेले कार्य, घेतलेली भूमिका, लेखन व चर्चा याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

यावेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांचा कक्ष, तेथील स्टडी टेबल, बेड, खुर्ची, त्यांचे हस्ताक्षर तसेच 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या पुस्तकासंदर्भातील काही दस्तऐवज याबाबत इतिहास संशोधक प्रा. डॉ. नवनाथ काशिनाथ वाव्हळ यांनी संदर्भासहित सविस्तर माहिती दिली. या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी योगदान देणाऱ्या राष्ट्रीय नेत्यांच्या कार्याची प्रत्यक्ष ओळख झाली.

# सत्कारापेक्षा सत्कर्म करण्यातच समाधान मिळते - आरोग्यमित्र सुभाषराव गायकवाड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मानवी जीवन आणि संस्कृती सत्कार्यातून गतिशील होते, त्यामुळे सत्कारापेक्षा सत्कर्म हेच मला जीवनात समाधान देते, असे विचार आरोग्यमित्र सुभाषराव गायकवाड यांनी व्यक्त केले. येथील स्वाध्याय परिवाराचे सदस्य माजी प्राचार्य डॉ. शंकरराव गागरे, वाचन संस्कृती प्रतिष्ठानचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. बाबुराव उपाध्ये, पुण्यश्लोक अहिल्यादेवी सेवा मित्र परिवाराचे सदस्य प्रा. शिवाजीराव बारगळ आणि निमगाव -खैरी मित्र परिवार यांनी आरोग्यमित्र सुभाषराव गायकवाड यांचा सत्कार केला, त्याप्रसंगी ते बोलत होते.

आरोग्यमित्र सुभाषराव गायकवाड यांनी श्रीसंत सावता महाराज यांची पुण्यतिथी, श्रीज्ञानेश्वरी पारायण सोहळा, स्व. सोमनाथ गायकवाड १४ वा स्मृतिदिन आणि वारकरी संप्रदाय दिंडी भक्त परिवार सेवा कार्यक्रमांच्या निमित्ताने उपक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी अनेक मान्यवर पाहुणे व पुरुष महिला भक्तगण,भजनी मंडळ उपस्थित होते.

आरोग्य, संत, समाज, संस्कृती आणि जीवन सेवेचा सत्कार- डॉ.बाबुराव उपाध्ये डॉ. उपाध्ये म्हणाले,आरोग्यमित्र सुभाषराव गायकवाड यांचे जीवन सेवाभावी आहे. त्यांनी आरोग्यसेवा, संतसेवा, समाजसेवा, संस्कृतीपूजा यांचा आदर्श निर्माण केला आहे, सेवाभावी कडुभाऊ काळे यांच्या सेवेचा संस्कार लाभलेले सुभाषराव गायकवाड यांनी नागेबाबा पतसंस्था आणि इतर उपक्रमांत स्वतःला समर्पित केले आहे, त्यांच्या जीवन कार्याचा आणि त्यांच्या कार्याला हे नमन असल्याचे डॉ. उपाध्ये यांनी सांगितले.

सुभाषराव गायकवाड यांनी सर्व पारायण सोहळा भक्त परिवाराचे स्वागत केले.प्राचार्य डॉ. शंकरराव गागरे, प्रा. शिवाजीराव बारगळ यांनी उपक्रमाचे कौतुक केले.यावेळी डॉ.उपाध्ये यांनी सर्वांना पुस्तके भेट दिली. निमगाव – खैरी ग्रामस्थ आणि भगवत भक्त उपस्थित होते. दिंडी भक्तांना फराळ, चहा आणि उपस्थितांना महाप्रसाद देऊन उपक्रमांची सांगता झाली.

# एमआयडीसी हद्दीत जनावरे चोरणारी टोळी पुन्हा सक्रिय!

**शेळ्यांपाठोपाठ राहुलनगरमधून दोन गायी लंपास; पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पैठण एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत जनावरे चोरीचे सत्र पुन्हा सुरू झाल्याने शेतकरी व पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ढोरकिन परिसरात गेल्या काही दिवसांपासून शेळ्या चोरीच्या घटना सुरू असतानाच आता राहुलनगर येथून मध्यरात्री गोठ्यात बांधलेल्या दोन गायी चोरट्यांनी लंपास केल्याची घटना समोर आली आहे.

ढोरकिन परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून शेळ्या चोरीला जाण्याच्या घटना घडत आहेत. तब्बल दोन वर्षांच्या विश्रांतीनंतर भुरटे चोर पुन्हा सक्रिय झाल्याचे दिसून येत असतानाच आता चोरट्यांनी आपला मोर्चा मोठ्या जनावरांकडे वळविल्याने नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे.

राहुलनगर येथे मध्यरात्री दोन ते तीन वाजेच्या सुमारास चोरट्यांनी गोठ्यात प्रवेश करून बांधलेल्या दोन गायी चोरून नेल्या. सकाळी जनावरे दिसून न आल्याने चोरीचा प्रकार उघडकीस आला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. शेळ्यांनंतर आता गायींची चोरी सुरू झाल्याने जनावरे चोरणारी टोळी पुन्हा सक्रिय झाली आहे का? असा सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत. रात्रीच्या वेळी गोठ्यात बांधलेल्या जनावरांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, पशुपालकांना जागता पहारा देण्याची वेळ आली आहे. एमआयडीसी पोलिसांनी या घटनांची गांभीर्याने दखल घेऊन चोरट्यांचा तातडीने शोध घ्यावा, परिसरात रात्रीची गस्त वाढवावी आणि चोरीला गेलेली जनावरे परत मिळवून द्यावीत, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.

## शब्दकोडे क्रमांक : २७

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ■ | ४ | ५ | | ■ | ६ | ७ |
| | ■ | ८ | | ■ | ९ | ■ | | ■ | १० | | |
| ११ | १२ | | ■ | १३ | ■ | १४ | | १५ | ■ | | ■ |
| १६ | | ■ | १७ | | | | ■ | १८ | १९ | ■ | २० |
| ■ | २१ | २२ | | | ■ | २३ | २४ | ■ | २५ | २६ | |
| २७ | ■ | २८ | | ■ | २९ | ■ | ३० | ३१ | ■ | | ■ |
| ३२ | ३३ | | ■ | ३४ | | | ■ | ३५ | | ■ | ३६ |
| ३७ | | ■ | ३८ | ■ | | ■ | ३९ | | ■ | ४० | |
| ■ | ४१ | ४२ | ■ | ४३ | | ४४ | | ■ | ४५ | ■ | |
| ४६ | ■ | ४७ | ४८ | | ■ | | ■ | ४९ | | | ■ |
| ५० | | ■ | | ■ | ५१ | | | ■ | | ■ | ५२ |
| | ■ | ५३ | | | ■ | | ■ | ५४ | | | |

**आडवे शब्द :** १. महाराष्ट्रातील एक जिल्हा ४. वाईट इच्छा ६. दीप ८. नापास विरुद्ध ९. इंग्रजीत तळपायाचची बोटं १०. भात आणि भाजी मिळून तयार होणारे खाद्यपदार्थ ११.एक चवदार मासा १४.चौकात एकत्रित बसून गप्पा मारण्याची जागा १६. तग १७. एक गोड पेय १८.आब,इज्जत २१. हिंदीत द्वेष २३.बशीचा जोडीदार,चहा पिण्याचे पात्र २५.वाद्य वाजवणारा २८. रुची ३०. नशीब इंग्रजीत ३२. कारणीभूत ठरलेला ३४.भारताचे राष्ट्रीय फूल ३५. बंध ३७. नजर ३८. संगीत सप्तकातील अखेरचा स्वर ३९. हाव ४०. खरा - विरुद्ध ४१. विचार ४३. सप्त सुरांची धून ४७. वचन ४९. थोर कृष्ण सखा ५०. पाणी ५१. आळ ५३. मनुष्य ५४. टावरासु- उलट लिहा

**उभे शब्द :** १.नरकाचे अधिपती २. शोध ३. महिना ५. रियाज ६. मनास तात्पुरता मिळालेला आनंद ७. मोकळीक १२. वांती १३. पुन्हा १४.एक काल्पनिक पक्षी १५. इंग्रजीत- खोल १७. हुशार १९. चपाती भाजण्याचे साधन २०. चक्र २२. अंतर २४. क्षण २६. बाद- उलट लिहा २७. बंधनात नसलेला २९. मजदूर ३१. गोंधळ ३३. रोकड ३६. लाकडाची पेटी ३९. हिंदीत - मेण ४२. ग्रामीण बोलीत तेव्हा ४३. नेहमी ४४. गोंगाट ४५. स्त्री कलाकार हिंदी ४६. वाजवी दरातला ४८. संगीतातील एक राग ५२. नफा विरुद्ध

**शब्दकोडे क्रमांक : २६ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शि | व | से | ना | | म | न | मा | नी | | वा | व |
| का | | वा | | सा | ल | स | | ट | र | फ | ल |
| री | घ | | क | ल | म | | का | | सा | | य |
| | र | वा | ळ | | ल | ल | का | र | | ह | |
| खो | टे | | प | ती | | त | | म | द | म | स्त |
| ड | | ना | | न | वा | | ह | मा | ल | | र |
| | बे | का | बू | | त | न | | ण | | मे | |
| चा | ल | | ट | र | | त | म | | क | ह | र |
| | न | ड | | शी | त | | द | वा | | न | व |
| दु | | ग | ट | | र | पे | ट | | छ | त | |
| का | य | र | | पा | | ट | | ग | प्प | | आ |
| न | स | | न | व | री | | घो | | र | मा | ई |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### ''दिल है हिंदुस्तानी'' स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्ती गीतांची सुरेल मैफल




अहिल्यानगर- स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला नगरकर रसिकांसाठी एक खास सांगीतिक पर्वणी ''दिल है हिंदुस्तानी'' या देशभक्ती गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन १३ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता माऊली सभागृहात करण्यात आले आहे. पी. आर. मिडिया आणि ऑरेंज इव्हेंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने गेली आठ वर्षे या कार्यक्रमाचा गौरवशाली ठसा दरवर्षी उमटत आहे. या वर्षीही, देशप्रेमाचा सूर आणि स्वातंत्र्याच्या लढ्याची गाथा संगीताच्या माध्यमातून मांडणारी ही मैफल नगरच्या सांस्कृतिक जीवनात एक उजळ क्षण ठरणार आहे. या मैफलीचे उद्घाटन प्रसिद्ध व्याख्याते डॉ. संजय कळमकर डॉ. बापूसाहेब कांडेकर, यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या वेळी अजिनाथ हजारे, कडुभाऊ काळे, किरण वर्पे, डॉ. दमन काशीद, संतोष शिंदे, ज्ञानेश्वर गाडे, डॉ . प्रदीप इंगळे, डॉ. हेमंत इंगळे,अजय गावडे, आशिष शिंगवी, डॉ. इमरान शेख, विशाल बुऱ्हाडे, प्रा. रवींद्र काळे, गणेश गायकवाड, डॉ . स्नेहा शिरसाठ, डॉ. सागर शिरसाठ, डॉ. संतोष गांगर्डे, आदी ठोंबे, धनेश खत्ती, किरण गवते, भूषण ओसवाल, रोहित भगत, अमोल खोले,तुषार चोरडिया, निलेश चिप्पा, अभिषेक शेलार ॲड हेमंत कराळे, ॲड सचिन चंदनशिव, अविनाश कराळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.अशी माहिती प्रा. अदेश चव्हाण यांनी दिली.या कार्यक्रमात अजरामर देशभक्ती गीतांच्या माध्यमातून स्वातंत्र्याचा इतिहास, शौर्यगाथा आणि देशप्रेम व्यक्त केलं जाणार आहे. गायक कलाकार म्हणून प्रा. आदेश चव्हाण, डॉ. दमन काशीद, भाग्यश्री डुंबारे (पुणे), रेणुका पवार, जालिंदर शिंदे,सागर मेहेत्रे, सागर होनराव, आरती पेरेपाडम यांची सुरेल गायन मैफल रंगणार आहे.

### राष्ट्रीय मानवाधिकार सेवा संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी राजेंद्र गायकवाड



अहिल्यानगर - राष्ट्रीय मानवाधिकार सेवा संघटन या सामाजिक संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी राजेंद्र महादूजी गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. एम. एल. शर्मा यांच्या आदेशाने नियुक्तीचे अधिकृत अधिघोषण-पत्र जारी करण्यात आले. राजेंद्र गायकवाड हे अहिल्यानगर येथील रहिवासी असून, सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. मानवाधिकारांचे संरक्षण, सामाजिक न्याय, वंचित व दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत संघटनेने महाराष्ट्र प्रदेश सचिवपदाची जबाबदारी दीली आहे. राष्ट्रीय मानवाधिकार सेवा संघटन ही कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसलेली सामाजिक संघटना आहे. जात, भाषा आणि प्रदेश- सबसे बढ़कर भारत देश हा संघटनेचा संदेश असून, समाजातील सर्व घटकांना समान न्याय व मानवाधिकार मिळवून देण्यासाठी कार्य करण्याचा संघटनेचा प्रयत्न आहे. राजेंद्र गायकवाड यांच्या नियुक्तीमुळे अहिल्यानगरसह महाराष्ट्रात संघटनेच्या सामाजिक व मानवाधिकारविषयक कार्याला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### पारनेरमधून राज्याला नवी दिशा; जीपीएसयुक्त ई-मोजणी नकाशासाठी शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे महत्त्वपूर्ण पाऊल

पारनेर - राज्यातील महसूल व्यवस्थेत पारदर्शकता, मोजणी प्रक्रियेत अचूकता आणि शेतकऱ्यांच्या मालमत्ता हक्कांचे संरक्षण सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीने महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. ई-मोजणी २.० अंतर्गत प्रत्येक मोजणी प्रकरणात अक्षांश व रेखांश समन्वयांसह अंतिम क प्रत मोजणी नकाशा नागरिकांना देणे बंधनकारक करावे, तसेच नमुना १-फ मधील सर्व शेत व पाणंद रस्त्यांची ऑनलाइन नोंदणी करून त्यांची सरसकट ई-मोजणी करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी पारनेरच्या तहसीलदार गायत्री सौंदाणे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.निवेदनात म्हटले आहे की, जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. २५ जून २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार ई-मोजणी २.० प्रणालीद्वारे करण्यात येणाऱ्या प्रत्येक मोजणी प्रकरणात अंतिम क प्रत मोजणी नकाशा जीपीएस समन्वयांसह अर्जदाराला देणे बंधनकारक आहे.

## आधुनिक तंत्रज्ञानामुळे सांधेबदल शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित व यशस्वी- डॉ. धनंजय कुलकर्णी

### अस्थिरोग तज्ज्ञांच्या कार्यशाळेत अत्याधुनिक उपचार पद्धतींवर मार्गदर्शन




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आधुनिक तंत्रज्ञानामुळे आणि वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे सांधेबदल शस्त्रक्रिया आता अधिक सुरक्षित व यशस्वी झाली असून रुग्णांना दीर्घकाळ वेदनामुक्त आनंदी आयुष्य जगणे शक्य झाले आहे. अत्याधुनिक अस्थिरोग शास्त्रातील तंत्रज्ञानावर आधारित असलेल्या या कार्यशाळेत मानवी सांधेबदल, पूर्व-तपासणी आणि आधुनिक तंत्रज्ञानावर सविस्तर मार्गदर्शनामुळे निश्चितच अस्थिरोग तज्ञांना याचा मोठा फायदा होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे सांधेबदल शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित ,यशस्वी व सुखकर झाली असल्याचे प्रतिपादन आय एम ए चे अध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी केले आय एम ए अहिल्यानगर ,अस्थिरोग तज्ञ संघटना अहिल्यानगर व संचेती हॉस्पिटल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अस्थिरोग तज्ञांसाठी आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

यावेळी अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी, सचिव डॉ.अमित करडे, डॉ.पांडुरंग डौले, संचेती हॉस्पिटल येथील गुडघा बदली व खुबा शस्त्रक्रिया तज्ञ डॉ साहिल संघवी, हाताचे सूक्ष्म शस्त्रक्रिया तज्ञ डॉ. वारीद अल्ताफ, माजी अध्यक्ष डॉ. सी .डी. मिश्रा, अध्यक्ष अस्थिरोग तज्ञ संघटना डॉ. संतोष चेडे, डॉ. राहुल पंडित, डॉ विजय पाटील, डॉ. अनिल आठरे, डॉ. प्रभास पाटील ,डॉ. संदीप सुराणा, डॉ महेश वीर , डॉ ऋषिकेश पवार , डॉ अनंत गायकवाड, डॉ शंकर शेळके , डॉ प्रभास पाटील, डॉ संदीप कळमकर, डॉ दीपक कळमकर , डॉ गणेश झरेकर , डॉ अनिल पाटील, डॉ संदीप सुराणा, डॉ जाहिद शेख, डॉ रोहन धोत्रे , डॉ अविनाश गाडेकर, डॉ सोनल भालसिंग , डॉ मंदार भोसले, डॉ अमोल गडक , डॉ अभिजीत नालकर तसेच संचेती हॉस्पिटलचे प्रमुख जनरल मॅनेजर डॉ राहुल चौबे आदींसह शहरातील अस्थिरोग रोग तज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते

गुडघा बदली व खुबा शस्त्रक्रिया तज्ञ डॉ साहिल संघवी म्हणाले सांधेबदल शस्त्रक्रियेसाठी रुग्णाचे वय किती आहे यापेक्षा त्यांची प्रतिकारशक्ती किती प्रभावि आहे .हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे तयार करण्यात आलेले नवीन इम्प्लांट्स () ३० ते ४० वर्षांपेक्षा जास्त काळ टिकत असल्याने आता रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी खूप जास्त वय होईपर्यंत किंवा व्हिलचेअरवर येईपर्यंत थांबण्याची गरज राहिलेली नाही शस्त्रक्रियेच्या यशामध्ये डॉक्टरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. शस्त्रक्रिया करण्यापूर्वी रुग्णाची शारीरिक स्थिती योग्य असणे आवश्यक आहे: मधुमेह नियंत्रण: रक्तातील साखरेचे प्रमाण (१) ७.५ ते ८ पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. नियंत्रण नसल्यास संसर्गाचा धोका वाढतो. शरीराचे वाढलेले प्रत्येक १ किलो वजन आपल्या गुडघ्यावर ४ किलो अतिरिक्त दाब टाकते. त्यामुळे वजन ५ किलोने घटवल्यास गुढघ्यांवरील २० किलो दाब कमी होतो व अनेकदा शस्त्रक्रिया टाळता येऊ शकते.

## आनंदऋषीजी हॉस्पिटल गरजूंच्या आरोग्याचा आधार – सविता फिरोदिया

### आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये १५० रुग्णांची मोफत हृदयरोग तपासणी; आचार्य श्री आनंदऋषिजी यांच्या १२६ व्या जयंतीचा उपक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** आनंदऋषीजी हॉस्पिटल हे मानवतेचे मंदिर असून, गरजूंच्या आरोग्याचा आधार ठरले आहे. हॉस्पिटलचे कार्डियाक सेंटर रुग्णांसाठी नवसंजीवनी ठरत आहे. या सेवा कार्यात योगदान देताना समाधान आणि आनंद मिळतो. समाजाची गरज ओळखून हॉस्पिटलमध्ये नवनवीन सुविधा निर्माण केल्या जात आहेत. या सुविधा समाजाला अर्पण करून त्याचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत असल्याचे प्रतिपादन सौ. सविता रमेश फिरोदिया यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त सीए रमेश फिरोदिया व सौ. सविताताई फिरोदिया (फिरोदिया एज्युकेशन ट्रस्ट) यांच्या वतीने स्व. बदामबाई फिरोदिया यांच्या स्मरणार्थ हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी सीए रमेश फिरोदिया, साक्षी फिरोदिया, सीए आयपी अजय मुथा, निखीलेंद्र लोढा, माणकचंद कटारिया, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, कार्डिओलॉजिस्ट डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. विनय छल्लाणी, डॉ. स्वप्निल शिंदे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात निखीलेंद्र लोढा यांनी फिरोदिया परिवाराच्या सामाजिक योगदानाचा गौरव केला. ते म्हणाले, 'शिका, कमवा आणि समाजाला परत द्या,' या तत्त्वावर फिरोदिया परिवाराचे जिल्ह्यात सामाजिक योगदान सुरू आहे. गेल्या १५ वर्षांत त्यांनी सामाजिक चळवळीत आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अल्पदरात सिटीस्कॅन, एमआरआय मशीन तसेच ब्लड बँकेची सुविधा त्यांच्या आर्थिक योगदानामुळे शक्य झाली आहे. हॉस्पिटलच्या सेवा कार्यात त्यांचे मोठे योगदान असून, अनेक प्रकल्पांना त्यांनी हातभार लावला आहे. हॉस्पिटलच्या अद्ययावत मशिनरीसाठीही त्यांनी योगदान दिले आहे. तसेच अनेक संस्थांचे आधारस्तंभ म्हणून ते कार्य करत असल्याचे लोढा यांनी सांगितले.

सीए आयपी अजय मुथा म्हणाले की, आयुष्यात प्रगती करण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, हे ओळखून सीए रमेश फिरोदिया यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोठे सामाजिक कार्य उभे केले आहे. बिकट परिस्थितीत शिक्षण घेऊन ते सीए झाले. मुंबईत उत्तम यश मिळवल्यानंतरही सामाजिक बांधिलकी जोपासत ते पुन्हा आपल्या शहराशी व गावाशी जोडले गेले आणि सामाजिक योगदान देण्यास सुरुवात केली. आपल्या मूळ गावात त्यांनी महाविद्यालयाची स्थापना केली असून, त्यामध्ये ८०० पेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. समाजाच्या प्रत्येक कार्यात योगदान देताना जैन सोशल फेडरेशनच्या सेवाकार्यातही त्यांचे सहकार्य लाभत आहे. शिक्षण, आरोग्य आणि धार्मिक क्षेत्रात त्यांनी मोठे कार्य केले असून, मानवसेवेच्या कार्यात त्यांचा नेहमीच पुढाकार असतो, असे मुथा यांनी सांगितले.

## 'दोन शब्द'चे आगळेवेगळे प्रकाशन; विद्यार्थ्यांच्या हस्ते गुरूच्या पुस्तकाचे लोकार्पण

### 'माझे विद्यार्थी हेच माझे संजीवन' – डॉ. स्मिता देशपांडे भुसे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** एपिग्राम प्रकाशन, मुंबईच्या माध्यमातून डॉ. स्मिता देशपांडे भुसे यांच्या 'दोन शब्द' या ललित लेखसंग्रहाचे आगळ्यावेगळ्या पद्धतीने प्रकाशन करण्यात आले. स्वतः च्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी नामवंत व्यक्तींना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्याऐवजी आपल्या विद्यार्थ्यांनाच प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करून त्यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्याचा अनोखा उपक्रम डॉ. भुसे यांनी केला. त्यामुळे हा प्रकाशन सोहळा केवळ पुस्तक प्रकाशन न राहता शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील जिव्हाळ्याच्या नात्याचा आणि ऋणानुबंधाचा सुंदर सोहळा ठरला.

डॉ. स्मिता देशपांडे भुसे या हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयात मराठी विषयाचे अध्यापन करतात. अध्यापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी केवळ शैक्षणिक नाते न ठेवता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी, भावविश्वाशी आणि जीवनप्रवासाशी जोडले जाणारे शिक्षक म्हणून त्यांची ओळख आहे. विद्यार्थ्यांप्रती असलेला हा जिव्हाळा त्यांच्या लेखनातूनही सातत्याने व्यक्त होत असतो.

फेसबुक या आभासी व्यासपीठावर त्या 'समाधानाची फुले' या लेखमालिकेतून आपल्या विद्यार्थ्यांविषयी आवर्जून लिहित आहेत. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सकारात्मक पैलू, त्यांचे कर्तृत्व, त्यांच्या वाटचालीतील संघर्ष आणि यश यांची दखल घेणाऱ्या या लेखमालिकेची सध्या मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील छोट्या-मोठ्या यशाचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देण्याचा त्यांचा हा प्रयत्न शिक्षक-विद्यार्थी नात्याला एका वेगळ्याच उंचीवर नेणारा ठरत आहे.

याच भावनेतून 'दोन शब्द' या ललित लेखसंग्रहाच्या प्रकाशनाचा निर्णयही त्यांनी घेतला. पुस्तक प्रकाशनाच्या पारंपरिक पद्धतीला छेद देत त्यांनी आपल्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावलेल्या विद्यार्थ्यांनाच या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे केले. त्यामुळे आपल्या गुरूच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्याचा मान विद्यार्थ्यांना मिळाला आणि शिक्षकाने विद्यार्थ्यांवर ठेवलेला विश्वास, प्रेम व अभिमान याची अनोखी अनुभूती या प्रसंगी उपस्थितांना आली.

या प्रसंगी बोलताना डॉ. स्मिता देशपांडे भुसे म्हणाल्या, ''माझे विद्यार्थी हेच माझे संजीवन आहेत. आयुष्यात जेव्हा जेव्हा आता नोकरीमधून निवृत्त व्हावे असे वाटले, तेव्हा जून महिन्यात नव्याने आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यामधील मराठी विषयावरील प्रेम हेच माझ्यासाठी वरदान ठरले आहे. म्हणून आज माझ्या पुस्तकाचे प्रकाशन माझ्या विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात मला विशेष आनंद होत आहे.''

त्यांच्या या भावपूर्ण मनोगतातून विद्यार्थ्यांबद्दल असलेला आत्मीयतेचा भाव प्रकर्षाने जाणवला. शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान देणे एवढेच आपले कर्तव्य नसून त्यांच्या आयुष्याच्या वाटचालीत त्यांच्यासोबत उभे राहणे, त्यांच्या गुणांचे कौतुक करणे आणि त्यांच्या यशाचा आनंद स्वतःच्या यशाप्रमाणे साजरा करणे, हीच खरी गुरू-शिष्य परंपरा असल्याचा संदेश या प्रकाशन सोहळ्यातून देण्यात आला.

या आगळ्यावेगळ्या प्रकाशन सोहळ्यात डॉ. स्मिता देशपांडे भुसे यांच्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय वाटचालीचेही दर्शन घडले. मानसोपचारतज्ज्ञ सुकन्या फणसाळकर, आर.जे. प्रसन्न पाठक, बालनाट्यभूमीतील रंगकर्मी तेजा पाठक, जिओ स्टारचे असिस्टंट मॅनेजर विराज मुनोत, प्रसिद्ध उद्योगपती अमित गरुड, राज ऑप्टिकलचे किरण महाजन, सिद्धार्थ एंटरप्राईजेसचे संकेत होशींग, शासकीय अधिकारी अजिंक्य सोनवणे, अभिनेता तेजस अतितकर, प्राध्यापक ऋतुजा कुलकर्णी आणि तेजस पवार हे विद्यार्थी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## खरवंडी कासार येथे चिमुरडीचा थरारक दोरीवरील खेळ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**खरवंडी कासार –** येथील मुख्य बाजारपेठेच्या रस्त्यावर आज एका चिमुरडीने दाखवलेल्या दोरीवरील थरारक कसरतींनी उपस्थितांच्या काळजाचा ठोका चुकवला. पोटाची खळगी भरण्यासाठी भर उन्हात जिवाची पर्वा न करता केलेल्या या खेळाने स्थानिक नागरिक आणि पादचाऱ्यांचे विशेष लक्ष वेधून घेतले.जिवाची पर्वा न करता कसरतएका बाजूने दुसऱ्या बाजूला बांधलेल्या मजबूत दोरीवर ही चिमुरडी अत्यंत आत्मविश्वासाने चालत होती.संतुलन राखण्यासाठी तिच्या हातात एक लांब लाकडी काठी होती.डोक्यावर स्टीलचे लहान हंडे ठेवून तिने दाखवलेले संतुलन वाखाणण्याजोगे होते.नागरिकांची गर्दी आणि मदतबाजारपेठेतील जय भगवान कलेक्शन समोरील रस्त्यावर हा खेळ सुरू होता. हा थरार पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा लोकांनी मोठी गर्दी केली होती. चिमुरडीचे धाडस पाहून अनेकांनी तिचे कौतुक केले, तर काहींनी या गरिबांच्या पोटाच्या लढाईबद्दल हळहळ व्यक्त केली. खेळ संपल्यानंतर उपस्थित नागरिकांनी या कुटुंबाला आर्थिक मदत देखील केली.

## चेअरमन भगवान यशवंत दराडे यांचे दु:खद निधन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**खरवंडी कासार –** खरवंडी कासार विविध कार्यकारी सोसायटीचे विद्यमान चेअरमन तथा मालेवाडी येथील रहिवासी भगवान यशवंत दराडे (गुरुजी) यांचे रविवारी एका भीषण अपघातात दुःखद निधन झाले. या धक्कादायक घटनेमुळे मालेवाडी परिसरासह संपूर्ण खरवंडी कासार भागावर मोठी शोककळा पसरली आहे.अपघाताची पार्श्वभूमी व उपचार मिळालेल्या माहितीनुसार, भगवान दराडे गुरुजी हे शिरूर कासार येथून मालेवाडीकडे येत असताना मुंगसवाडे येथे त्यांच्या वाहनाला गंभीर अपघात झाला. या अपघातात ते गंभीररीत्या जखमी झाले होते. अपघातानंतर त्यांना तातडीने पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथील एका खाजगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले होते.

मात्र, रुग्णालयात उपचार सुरू असतानाच रविवारी सायंकाळी त्यांची प्राणज्योत मालवली सोमवारी मालेवाडी येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात दुपारी २ वाजता त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दराडे गुरुजींचे अंतिम दर्शन घेण्यासाठी आणि अंत्यविधीसाठी परिसरातील नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. याशिवाय राजकीय, सामाजिक व सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली वाहिली.एक अष्टपैलू व मनमिळावू व्यक्तिमत्त्व अशी ओळख भगवान दराडे गुरुजी हे केवळ सहकार क्षेत्रातच नव्हे, तर राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातही एक चांगल्या आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाचे धनी म्हणून सर्वपरिचित होते. त्यांचा स्वभाव अत्यंत मनमिळावू होता. सर्वसामान्यांशी असलेली त्यांची आपुलकी आणि प्रत्येकाच्या सुख-दुःखात धावून जाण्याच्या वृत्तीमुळे त्यांचा समाजात खूप मोठा जनसंपर्क निर्माण झाला होता.खरवंडी कासार विकास सोसायटीचे विद्यमान चेअरमन म्हणून काम करत असताना त्यांनी परिसरातील शेतकरी आणि सभासदांच्या विविध प्रश्नांसाठी नेहमीच हिरीरीने काम केले. त्यांच्या या अकाली व अकस्मात निधनामुळे सहकार, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कधीही भरून न निघणारी मोठी पोकळी निर्माण झाली असून, सर्व स्तरांतून तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात कुटुंबात पत्नी, दोन मुले,तिन मुली सुना नातवंडे भाऊ नातेवाईक असा मोठा मित्रपरिवार असा परिवार आहे. ढाकणवाडी विद्यमान सरपंच सुरेखा राजेंद्र ढाकणे यांचे ते वडील होत.

## कर्जबाजारी शेतकऱ्याची अजब मागणी; 'गांजा लागवडीला परवानगी द्या'

### गेवराई मर्दा येथील शेतकऱ्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; शेतीमालाला भाव मिळत नसल्याने कर्जफेडीची चिंता

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** शेतीमालाला मिळणारा कवडीमोल भाव, वाढते खतांचे दर आणि डोक्यावर वाढत चाललेला कर्जाचा डोंगर यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या संकटातून मार्ग काढण्यासाठी गेवराई मर्दा येथील एका शेतकऱ्याने चक्क आपल्या शेतात गांजा लागवड करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. शेतकऱ्याच्या या अनोख्या मागणीने प्रशासनासह परिसरातही चर्चा रंगली आहे.

गेवराई मर्दा येथील शेतकरी शिवनाथ भास्कर दौंड यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात आपल्या आर्थिक परिस्थितीचा पाढा मांडला आहे. खतांचे वाढते दर, शेतीमालाला मिळणारा कमी भाव आणि वाढत्या कर्जामुळे कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

कर्जाची परतफेड कशी करायची? असा प्रश्न सतावत असल्याचे सांगत, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि कर्जफेडीसाठी अधिक उत्पन्न मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यासाठी गांजासारख्या वनस्पतीच्या लागवडीतून उत्पन्नाचा पर्याय निर्माण होऊ शकतो, असा दावा करत त्यांनी येणाऱ्या हंगामात गांजा लागवडीस परवानगी देण्याची मागणी केली आहे. दरम्यान, बेकायदा पीक घेण्याची परवानगी मागण्याची वेळ शेतकऱ्यावर का आली? असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत असून, शेतीमालाला योग्य भाव, वाढता उत्पादन खर्च आणि कर्जबाजारीपणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## शिक्षण, संघटनातून आदिवासी समाजाच्या विकासाला गती द्या

### पैठणमध्ये जाणीव–जागृती मेळावा; आमदार विलास भुमरे यांची प्रमुख उपस्थिती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** आदिवासी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासासाठी समाजाने संघटित होऊन प्रयत्न करण्याची गरज आहे. शिक्षणाच्या माध्यमातून पुढील पिढी सक्षम करण्यासोबतच शासनाच्या विविध योजनांचा लाभ समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी सामूहिक प्रयत्न करा, असे आवाहन आमदार विलास संदिपान भुमरे यांनी केले.

पैठण येथे आदिवासी समाजाच्या वतीने जाणीव-जागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आदिवासी समाजातील नागरिक, युवक, महिला तसेच विविध क्षेत्रांतील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मेळाव्यात आदिवासी समाजाच्या विविध समस्या, शैक्षणिक सुविधा, रोजगाराच्या संधी, शासनाच्या कल्याणकारी योजना आणि सामाजिक-आर्थिक विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. समाजातील युवकांनी शिक्षण, रोजगार, व्यवसाय तसेच सामाजिक कार्यात पुढाकार घेऊन समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

समाजाची संस्कृती आणि अस्मिता जपत आधुनिक शिक्षणाची कास धरा, असे सांगत प्रत्येक कुटुंबाने मुला-मुलींना उच्च शिक्षण देऊन स्वावलंबी करण्यावर भर देण्यात आला. आदिवासी समाजातील नागरिकांना त्यांच्या हक्क व अधिकारांची जाणीव करून देणे, तसेच उपलब्ध शासकीय योजनांचा प्रभावी लाभ मिळवून देण्यासाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार मेळाव्यात व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजक अशोक बर्डे यांनी आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांवर प्रकाश टाकत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची भूमिका मांडली.

यावेळी मराठवाडा अध्यक्ष गोरखराव पवार, विनोद बोबले, भूषण कावसानकर, पंचायत समितीचे उपसभापती संजय लघाने, पोपटराव औटे, राजू गायकवाड, मनोज गायके, विलास आडसुळ, सलीम भाई, भागवत गिरगे, आबासाहेब गिरगे, रघुनाथ इछैय्या, नवनाथ हजारे, शुभम इंगळे यांच्यासह आदिवासी समाजातील पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेळाव्याच्या माध्यमातून आदिवासी समाजात शिक्षण, संघटन आणि विकासाची नवी जाणीव निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. समाजाच्या हक्कांसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# संत सावता महाराजांनी कर्मालाच ईश्वरसेवेचे माध्यम बनवले – उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

## फिनिक्स सोशल फाऊंडेशनतर्फे ३२५ रुग्णांची नेत्रतपासणी; संत सावता महाराज पुण्यतिथीचा उपक्रम । ७२ रुग्णांवर पुण्यात होणार मोफत शस्त्रक्रिया



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संत सावता महाराजांनी कर्मालाच ईश्वरसेवेचे माध्यम मानून समाजाला माणुसकी, श्रमप्रतिष्ठा आणि भक्तीचा संदेश दिला. याच विचारांचा वारसा पुढे नेत फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून जालिंदर बोरुडे हे धर्म, जात-पंथाचा भेद न करता गोरगरीब व गरजू नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देत आहेत. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना दृष्टी मिळवून देण्याचे तसेच नेत्रदान व अवयवदानाबाबत जनजागृती करण्याचे त्यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी केले.

संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने सोमवारी (दि. १० एप्रिल) नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिरात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव बोलत होते. यावेळी ग्रामविस्तार अधिकारी नेताजी भाबड, फिनिक्स फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, ग्रामपंचायत सदस्य मयुर पाखरे, युवा नेते यशवंत पानमळकर, संजय ताजणे, राजेंद्र बोरुडे, ह.भ.प. मोहनीराज कुऱ्हे, भानुदास खरपुडे, युवा नेते सोमनाथ जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, संत सावता महाराज हे वारकरी संप्रदायातील महान संत होते. त्यांनी भक्तीबरोबरच कर्माला आणि कर्तव्याला सर्वोच्च स्थान दिले. शेतीचे काम करत असतानाच त्यांनी विठ्ठलाची भक्ती केली. त्यामुळे त्यांच्या जीवनातून 'काम हेच देवाची सेवा' आणि 'माणसाची सेवा हीच खरी ईश्वरसेवा' हा संदेश समाजाला मिळतो. संत सावता महाराज पंढरपूरला जाण्यापेक्षा आपल्या कर्तव्याच्या ठिकाणीच विठ्ठलाचे दर्शन घेत होते, अशी त्यांच्या जीवनाशी निगडित लोकपरंपरा आहे. कर्मातच देव पाहण्याचा हा विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे जालिंदर बोरुडे यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या सामाजिक कार्याची माहिती दिली. शेतकरी, ज्येष्ठ नागरिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिकांना भेडसावणारे दृष्टीदोष दूर करून त्यांच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्यासाठी फाऊंडेशन सातत्याने काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले. महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथी तसेच विविध सण-उत्सवांच्या निमित्ताने सामाजिक उपक्रम राबविण्याची परंपरा फिनिक्स सोशल फाऊंडेशनने सुरू ठेवली आहे. त्याचबरोबर दर महिन्याला मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिरांचे आयोजन केले जात असल्याची माहिती बोरुडे यांनी दिली.

नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिरात आयोजित या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची नेत्रतपासणी केली. एकूण ३२५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ७२ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली असून, पुणे येथील के. के. आय. बुधराणी हॉस्पिटलमध्ये या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. नेत्रतपासणीबरोबरच ज्येष्ठ नागरिकांसाठी रक्तदाब, मधुमेह यासह आवश्यक आरोग्य तपासण्या मोफत करण्यात आल्या. गरजू रुग्णांना अल्पदरात चष्म्याचे वाटपही करण्यात आले.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून केवळ उपचार व आरोग्य शिबिरांपुरते काम मर्यादित न ठेवता नेत्रदान आणि अवयवदानाबाबत समाजात जनजागृती केली जात आहे. नेत्रदानामुळे अंधत्वाच्या अंधारात असलेल्या व्यक्तीच्या जीवनात प्रकाश निर्माण होऊ शकतो, तर अवयवदानामुळे गंभीर आजारांशी झुंजणाऱ्या रुग्णांना नवजीवन मिळू शकते. या सामाजिक जाणिवेतून फाऊंडेशनचे कार्य सुरू असून, अनेक दृष्टीहीनांना नेत्रदानाच्या माध्यमातून नवदृष्टी मिळण्यासाठी नेत्रदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल हे मानवसेवेतून निर्माण झालेले आरोग्य मंदिर - अशोक भंडारी

## दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया बिनटाका शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद ११०रुग्णांची तपासणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आचार्य गुरुदेव आनंदऋषीजी म.सा.यांच्या आशीर्वादाने सुरू झालेले आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ''मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा'' आहे. हे समजून आरोग्यसेवा दिली जात आहे. आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांची सेवा घडत आहे.या मोफत आरोग्य शिबिरात भंडारी परिवाराला आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील शिबिराचे माध्यमातून सेवा करण्याची भाग्य मिळाले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे रुग्णसेवेचे कार्य दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे. हॉस्पिटल मधील सर्व डॉक्टर्स नर्सेस व कर्मचारी निस्वार्थ भावनेने रुग्णसेवेचे कार्य करीत आहेत.आनंदऋषीजी हॉस्पिटल हे मानवसेवेतून निर्माण झालेले आरोग्य मंदिर आहे.असे प्रतिपादन उद्योजक अशोक भंडारी यांनी केले आहे.

राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा.यांच्या १२६ व्या जन्मदिना निमित्त दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया बिनटाका शिबिराचे आयोजन धनलक्ष्मी ट्रेडिंग कंपनी (अहिल्यानगर/नाशिक) व भंडारी परीवाराच्या वतीने करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन उद्योजक अशोक भंडारी यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले.या याप्रसंगी सौ.सविता भंडारी,पराग भंडारी, सौ.निकीता भंडारी,उद्योजक राजेश भंडारी,सौ.नयना भंडारी,सी.ए सोहन गुगळे,कु. प्रेषिका भंडारी,मानविक भंडारी आदींसह जैन सोशल फेडरेशनचे डॉ.वसंत कटारीया,सतीश लोढा,सुभाष मुनोत,डॉ. आशिष भंडारी,प्रकाश छल्लाणी,वसंत चोपडा शिबिराचे तज्ञ डॉ.भास्कर जाधव,डॉ.रविंद्र मुथा,डॉ.महेश घुगे आदी उपस्थित होते.

निकिता भंडारी म्हणाले,आनंदऋषीजी हॉस्पिटलचे शिबिराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात सेवा कार्य सुरू आहे.जैन सोशल फेडरेशनने या शिबिरात सहभागी होण्याची संधी भंडारी परिवाराला दिल्याबद्दल शतशः ऋणी आहे.भविष्यात ही सेवा करण्याची संधी भंडारी परिवाराला द्यावी.

उद्योजक राजेश भंडारी म्हणाले,धावपळीच्या युगामध्ये प्रत्येकाला वेगवेगळ्या आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून विविध आजारांवर उपचार व शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या जात आहेत.दररोज पाचशे ते हजार रुग्ण या आरोग्य सेवेचा लाभ घेत आहे. आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गोरगरीब जनतेची व समाजाची सेवा घडत आहे.या आरोग्य सेवेच्या महान कार्यात जैन सोशल फेडरेशन चे सर्व सदस्य मोठे योगदान देत आहे.व समाजाला भूषणावह असे कार्य करीत आहे.वर्धमान महावीर स्कूल व आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. ही कौतुकास्पद बाब आहे.

प्रास्ताविकात डॉ.वसंत कटारीया म्हणाले,समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत रुग्णसेवेचे कार्य पोहोचले पाहिजे ही भावना व उद्देश डोळ्यासमोर ठेवून हॉस्पिटलचे रुग्णसेवेचे कार्य अविरतपणे सुरू आहे. अशोक भंडारी व भंडारी परिवार धार्मिक असून सामाजिक कार्यात अग्रेसर आहे.भंडारी परिवाराने आयोजित केलेल्या शिबिरामुळे मोठ्या प्रमाणात रुग्णसेवा होत आहे.सामान्य रुग्णांना गुणवत्तापूर्वक व सवलतीच्या दरात आरोग्य सेवा मिळावी.यासाठी हॉस्पिटलच्या वतीने वर्षभर विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जात आहे.या शिबिरांचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा.

डॉ.महेश घुगे म्हणाले, हॉस्पिटलमध्ये दुर्बिणीद्वारे बिनटाका शस्त्रक्रिया अत्याधुनिक पद्धतीने व यशस्वीपणे केले जात आहेत. तसेच आतडे,फुफ्फुसे व कॅन्सर या सारख्या आजारांवरील शस्त्रक्रिया दुर्बीणद्वारे केल्या जात आहेत.या शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा. या शिबिरात ११० रुग्णांची तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. तर आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

# समर्थ आयटीआय कॉलेजचा निकाल प्रथम वर्ष १०० % व द्वितीय वर्ष ९७ % घोषित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**शेवगाव–** केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान संगमनेर संचालित, समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था राक्षी तालुका- शेवगाव जि. अहिल्यानगर येथील वार्षिक प्रात्यक्षिक व परीक्षा जून जुलै-२०२६ चा निकाल नुकताच लागला असून प्रथम वर्षाचा निकाल १००% तर द्वितीय वर्षाचा निकाल ९७ % लागला आहे . तसेच विद्यार्थ्यांची परीक्षे आधीच कॅम्पस प्लेसमेंट मधून नामंकित कंपनीमध्ये निवड झाली आहे अशी माहिती संस्थेचे कार्यकारी अधिकारी मा. प्रा . श्रीकांतजी ढाकणे यांनी दिली.

प्रथम वर्ष वायरमन या व्यवसाय मधून प्रथम क्रमांक कु शुभम अशोक बुचडे (८५.३३%), द्वितीय क्रमांक कु ज्ञानेश्वर मछिंद्र शिरसाठ (८५.%) तृतीय क्रमांक कु. विशाल रघुनाथ नाटकर (८०.३३%) इलेकट्रिशियन व्यवसाय मधून प्रथम क्रमांक कु सौरव नागनाथ भिसे (८८.१६%), द्वितीय क्रमांक कु अभिषेक सोन्याबाप्पू वीर (८८%) , तृतीय क्रमांक कु राम अंकुश डांगे (८७.१६%), फिटर या व्यवसायामधून प्रथम क्रमांक कु दिपक विठ्ठल कुठे (८०.३३%) द्वितीय क्रमांक कु गौतमराज गणेश काळे ( ८० )% ,तृतीय क्रमांक कु. अभिषेक किशोर जाधव (७८.३३%) वेल्डर या व्यवसायामधून प्रथम क्रमांक कु . मुकुंद योगेश मडके ( ७८.६६ %) द्वितीय क्रमांक कु प्रदीप प्रकाश टोपे .(७८ %) तृतीय क्रमांक कु सार्थक सदाशिव चोपडे (७७.३०%) द्वितीय वर्ष इलेकट्रिशियन व्यवसाय मधून प्रथम क्रमांक कु कार्तिक तात्यासाहेब चितळे (९१.१६%) द्वितीय क्रमांक कु रेवणनाथ आसाराम झुंबड (८९%) तृतीय क्रमांक कु शुभम रामदास ढोले (८८.८३%) द्वितीय वर्ष वायरमन या व्यवसायामधून प्रथम क्रमांक कु .सार्थक जोशी (८५%) द्वितीय क्रमांक कु संदीप तुकाराम जगताप (८१.८३%) तृतीय क्रमांक कु अर्जुन बाजीराव शेळके (७७%) . द्वितीय वर्ष फिटर या व्यवसायमधून प्रथम क्रमांक कु ज्ञानेश्वर राजेंद्र आगळे(७९.५०%) द्वितीय क्रमांक कु चैतन्य विठ्ठल गायके (७८.१६%) तृतीय क्रमांक कुविशाल केशव खेडकर (७६.३३%) घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. सर्व व्यवसाय निदेशक यांनी खास मेहनत घेऊन विद्यार्थ्यांचे १००% प्रॅक्टिकल व नियमित तासिका , तसेच ऑनलाईन सराव परीक्षा ,घेऊन अधिकाधिक सराव करून घेतला. त्याचाच परिपाक म्हणजे विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये मिळवलेले दैदिप्यमान यश असे मत संस्थेचे अध्यक्ष मा. एकनाथराव ढाकणे यांनी व्यक्त केले .

संस्थेचे अध्यक्ष मा. एकनाथरावजी ढाकणे , संस्थेचे कार्यकारी अधिकारी मा. प्रा . श्रीकांतजी ढाकणे . सचिव श्रीमती .जया रहाणें ,समन्यवक प्रा. ऋषिकेश ढाकणे , प्रशासकीय अधिकारी डॉ .आर.एच आत्तार प्राचार्य व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्वच स्तरावरून कौतुक होत आहे.

# श्रावण भारती प्रशाला मुंगुसवाडे येथे साकरतेय सुसज्ज आदर्श शाळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** (सतिश जगताप )पाथर्डी तालुक्या तील मुंगुसवाडे येथील श्रावण भारती बाबा प्रशालेच्या छताचे काम प्रलंबित; लोकसहभागाचे आवाहन विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी लोकसहभागातून शाळा आदर्श बनवण्याचा संकल्प; ग्रामस्थांना मदतीचे आवाहन करण्यात आले आहे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, स्वच्छ व सुसज्ज शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी मुंगुसवाडे – एकनाथवाडी येथील नागरिक आणि शाळा व्यवस्थापन सरसावले आहे. येथील श्रावण भारती बाबा प्रशाला, मुंगुसवाडे या शाळेमध्ये सध्या लोकसहभागातून सुसज्ज शाळा – लोकसहभाग अभियान राबवले जात आहे. या अंतर्गत काही महत्त्वाची कामे यशस्वीरीत्या पूर्ण झाली असली, तरी विद्यार्थ्यांच्या थेट सुरक्षेशी संबंधित वर्गखोल्यांच्या छताचे अत्यंत महत्त्वाचे काम अद्याप प्रलंबित असल्याने प्रशालेने आता समाजाला आर्थिक मदतीचे जाहीर आवाहन केले आहे.

झालेली कामे: ९०% शौचालय व पाणीप्रश्न सुटलाप्रशालेने दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी आणि स्वच्छतेसाठी अत्यंत गरजेचे असलेले मुलींचे शौचालय व दर्जेदार स्वच्छतागृहाचे काम तब्बल ९०% पूर्ण झाले आहे. यासोबतच अंडरग्राउंड पाईपलाईनचे कामही यशस्वीरीत्या आटोपले आहे. बोरवेलमध्ये नवीन मोटर टाकून




पिण्यासाठी व वापरासाठी पाणी बाहेर काढण्याचे काम पूर्ण झाल्यामुळे शाळेतील पिण्याच्या पाण्याचा कायस्वरूपी प्रश्न निकालात निघाला आहे.अत्यंत गरजेचे प्रलंबित काम: वर्गखोल्यांवरील जीर्ण पत्रे बदलणेशाळेचा पाण्याचा आणि स्वच्छतेचा प्रश्न सुटला असला, तरी सध्या एक मोठा धोका विद्यार्थ्यांवर घोंगावत आहे. विद्यार्थी ज्या वर्गांमध्ये दिवसभर बसून शिक्षण घेतात, त्या वर्गखोल्यांवरील लोखंडी पत्रे पूर्णपणे गंजून गेलेले असून ते अत्यंत जीर्ण अवस्थेत आहेत. पावसाळ्यात किंवा वादळी वाऱ्यात हे छताचे पत्रे कोसळण्याची भीती असून, ही आणीबाणीची व धोकादायक अवस्था पाहता विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी हे पत्रे तातडीने बदलणे अत्यंत आवश्यक आहे. शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी व इतर स्तर या कामासाठी पूर्णपणे सकारात्मक असून ते यासाठी मेहनत घेत आहेत.फूल ना फुलाची पाकळी: आर्थिक सहकार्याची गरज''आपल्या छोट्याशा मदतीतून आपल्या विद्यार्थ्यांचे मोठे भवितव्य सुरक्षित होईल,'' असा विश्वास व्यक्त करत प्रशालेचे शिक्षक जगताप सर यांनी सर्व पालक, नागरिक, उद्योजक आणि दानशूर व्यक्तींना आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले आहे. आपली देणगी थेट गुगल पे () किंवा फोनपे () च्या माध्यमातून पाठवण्यासाठी खालील अधिकृत संपर्क क्रमांक जारी करण्यात आला आहे:संपर्क व देणगीसाठी मोबाईल क्रमांक: ९४२०९५२९१७नाव: किसन गणपत जगताप (जगताप सर, शिक्षक)चला, एकत्र येऊया आणि आपल्या शाळेला आदर्श बनवूया! या भावनेने प्रेरित होऊन जास्तीत जास्त नागरिकांनी या लोकसहभाग अभियानात आपला वाटा उचलावा, असे आवाहन मुंगुसवाडे – एकनाथवाडी गावातील सुजाण नागरिकांमार्फत करण्यात आले आहे.

(पान १ वरून)

## महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या संवर्धनासाठी केंद्राचा विशेष निधी द्या

सहभाग असलेली यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. किल्ल्यांच्या संवर्धनाबरोबरच पर्यटकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधांचा विकास करण्याची मागणीही खासदार लंके यांनी केली आहे. किल्ल्यांवर सुरक्षितता व्यवस्था, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, दिशादर्शक फलक, माहिती केंद्रे, प्रशिक्षित मार्गदर्शक आणि सुरक्षित मार्ग यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. मात्र, या सुविधा उभारताना किल्ल्यांच्या ऐतिहासिक आणि नैसर्गिक स्वरूपाला कोणतीही बाधा येणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रातील किल्ल्यांना जागतिक दर्जाच्या पर्यटनस्थळांचा दर्जा मिळवून दिल्यास राज्याच्या पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळू शकते. देश-विदेशातील पर्यटक मोठ्या संख्येने किल्ल्यांना भेट देऊ शकतात. त्यातून स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण होऊन किल्ल्यांच्या परिसरातील गावांच्या अर्थव्यवस्थेलाही बळ मिळू शकते. त्यामुळे ऐतिहासिक वारशाचे जतन आणि पर्यटन विकास यांची सांगड घालणे आवश्यक आहे.

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाचा समावेश होणे ही राज्यासाठी अभिमानाची बाब आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यांच्या संवर्धनासाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावा आणि जागतिक वारसा म्हणून मान्यता मिळालेल्या किल्ल्यांसाठी स्वतंत्र संवर्धन व पुनरुज्जीवन पॅकेज जाहीर करावे, अशी ठोस मागणी खासदार नीलेश लंके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे.

## आदिवासी संस्कृतीच्या रंगात रंगले सावेडी; मिरवणुकीतून परंपरा आणि सांस्कृतिक वारशाचे दर्शन

कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध रानकवी तुकाराम धांडे यांनी आदिवासी कविता आणि निसर्ग कवितांचे सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमात विद्यार्थी, नारीशक्ती, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करून नावलौकिक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. त्यांच्या कार्याचा सन्मान करून समाजातील नव्या पिढीला प्रेरणा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. अध्यक्षीय भाषणातून आदिवासी सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष काशिनाथ गवारी यांनी आदिवासी समाजासमोरील भविष्यातील आव्हाने आणि त्यावरील उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. आदिवासी समाजाने शिक्षण, रोजगार, सामाजिक विकास आणि हक्कांच्या जाणीवेसाठी एकजुटीने पुढे येण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शरद कोरडे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रतिष्ठानचे गोंदके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अहिल्यानगरसह राहाता, अकोले, पाथर्डी, नेवासा, राहुरी, पारनेर, शेवगाव, संगमनेर आणि श्रीरामपूर येथील आदिवासी समाजबांधवांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश शेळके, आदिनाथ भांगरे, हेमंत घोडे, नितीन साबळे, देवराम पिचड, हनुमंत सोनवणे, संतोष नवले, धोंगडे साहेब, पथवे, निसरड, तुकाराम भांगरे, एकनाथ घोडे, नवनाथ बांबेरे तसेच आदिवासी सेवा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी परिश्रम घेतले.

## नेवासा खुर्द येथे जुन्या वादातून जीवघेणा हल्ला; १२ जणांविरोधात गुन्हा दाखल!

लक्ष ठेवून आहेत. आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेची () दोन पथके आणि नेवासा पोलिसांची दोन पथके अशी एकूण ४ विशेष पथके तयार करून विविध ठिकाणी रवाना करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी दिली. यापूर्वी वरिष्ठ पोलीस अधिकारी अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरु, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पवार आणि पोलीस उपनिरीक्षक विकास पाटील यांनी घटनास्थळ व रुग्णालयात भेट देऊन तपासाची पाहणी केली. नेवासा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६६९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९(१), १८९(२), १९०, १९१(२), (३), ३५१(२) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ व शस्त्र अधिनियम कलम ४, २५ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप वसावे करत आहेत.

गुन्हेगारांची गय केली जाणार नाही; आरोपींना लवकरच अटक करू! पो.नि. प्रताप दराडे

''नेवासा खुर्द येथील मारहाणीची घटना अत्यंत गंभीर असून यातील एकाही आरोपीला सोडले जाणार नाही. कायदा व सुव्यवस्था हातात घेणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल. पोलिसांची पथके आरोपींच्या शोधासाठी रवाना झाली असून सर्व आरोपींना लवकरच गजाआड केले जाईल. परिसरात शांतता ठेवावी, कोणीही अफवांवर विश्वास ठेवू नये.'' प्रताप दराडे (पोलीस निरीक्षक, नेवासा पोलीस ठाणे)

# लालटाकी येथे लक्ष्मीआईची यात्रा उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महालक्ष्मी माता मित्र मंडळाच्या वतीने आषाढी अमावस्यानिमित्त लालटाकी येथे लक्ष्मीआईची यात्रा उत्साहात पार पडली. मंडळाचे अध्यक्ष साहेबराव काते यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या शोभायात्रेत पारंपारिक वाद्यांच्या गजरात पोतराज व भक्तगण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

साहेबराव काते हे महालक्ष्मीचे भक्त असून, सालाबाद प्रमाणे दरवर्षी ते यात्रा उत्सवाचे आयोजन करुन, शोभायात्रा काढत असतात. या सोहळ्याचे हे २५ वे वर्ष असून. या शोभायात्रेचे प्रारंभ लालटाकी भारस्कर कॉलनी येथून झाले. पारंपारिक वाद्यांचे गजर व लक्ष्मीमातेच्या जयघोषाने परिसर दणाणून निघाला. सर्जेपुरा, दिल्लीगेट, न्यु आर्टस महाविद्यालय मार्गे लालटाकी येथील लक्ष्मीमाता मंदिरात या शोभायात्रेचा समारोप झाला. शोभायात्रेनंतर भाविकांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. याचा भाविकांसह परिसरातील नागरिकांनी लाभ घेतला.

यावेळी साहेबराव काते, सुशिलाबाई काते, आदिनाथ काते, योसेफ काते, राजू काळुंखे, मच्छिंद्र वैरागर, बहिरुनाथ वैरागर, सागर काते, संदीप त्रिभुवन, दत्तात्रय जाधव, अलंकार भोगले, यश जाधव, अनिता जाधव, आशाबाई मोहिते, सुनिल वैरागर, कार्तिका वाघमारे, भारती कुचेकर, गुनाबाई भोसले, भाग्यश्री मोहिते, संगिता कांबळे, सिताबाई वडागळे आदीसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.